**<u>रे मु नं. २२/२०१८ मध्ये नि. ३६ वर आदेश</u>**

( मथूराबाई जगन्नाथ गायकवाड वि. उत्तम भागूजी गजभीव )

प्रस्तुतचा अर्ज वादीने नि.क्र-३४ वरील आदेशाप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेकामी दाखल केलेला आहे. वादीने प्रस्तुतच्या अर्जात कथन केले आहे की सदर प्रकरणात वादीने नि. क्र. ३४ वर सदर प्रकरणामध्ये दुरुस्ती करण्याबाबत अर्ज दिला होता. सदरचा अर्ज नि.३४, दि. २०/०३/२०२४ रोजी या न्यायालयाने मंजूर केला होता व त्यातील आदेशाप्रमाणे १४ दिवसांच्या आत दुरुस्ती करण्याचा आदेश झाला होता. परंतु अर्जदाराकडून नजरचूकीने दुरुस्ती करता आली नाही. वादीने मुद्दामहून दुरुस्ती करण्यास उशीर केलेला नाही. वादीने मागितलेली दुरुस्ती न्यायाच्या दृष्टीने गरजेची आहे. सबब वादीला नि.३४ वरील आदेशाप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जाला म्हणणे दिले व दुरुस्ती करण्यास हरकत नाही असे कथन केले आहे.

३. अर्जदाराचे वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १८ प्रमाणे ज्या पक्षकाराने सुधारणा करण्याच्या परवानगीचा आदेश मिळवला असेल त्या पक्षकाराने, आदेशाद्वारे त्या प्रयोजनार्थ नेमून दिलेल्या कालमर्यादेत आणि किंवा कालमर्यादा दिली नसल्यास, आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत त्यानुसार सुधारणा केली नाही तर, उपरोक्त प्रमाणे अशी कालमर्यादा किंवा यथास्थीती, असा १४ दिवासांचा कालावधी संपल्यानंतर, न्यायालयाने मुदत वाढवून न दिल्यास त्या पक्षकारास त्यात सुधाराणा करण्याची परवानगी दिली जाणार नाही. परंतु मा. मुंबई उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांच्या न्यायनिर्णयात क्रम ६ नियम १८ ची प्रक्रिया काटेकोरपणे राबवली तर ते न्यायोचित ठरणार नाही. तसेच मुदत निघून गेल्यावरही कोर्ट खर्च बसवून दुरुस्तीची परवानगी देउ शकते असे प्रतिपादित केले आहे. Salmona Villa Hsg. Cooperative Soc. Ltd. Vs. Mary Fernandis and Ors. AIR 1997 Bom 208 मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी असे निर्देशित केले आहे की 'procedure under Rule 18 of Order 6 should not be applied so rigorously and with hyper technical stress that it breaks the strings of substantial justice”

५.        प्रस्तुत अर्जात अर्जदाराने असे कथन केले आहे की वादीला वेळेत नि.३४ च्या आदेशाप्रमाणे नजरचूकीने दुरुस्ती करण्याचे राहून गेले आहे असे कथन केले आहे. मा. मुंबई उच्च न्यायालय यांचे सालमोना विला को.ऑप हौ. सोसायटी (सुप्रा) मधील वरील नमूद निर्देश तसेच अर्जदाराने प्रस्तुत अर्जात दिलेले कारण लक्षात घेता सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य होईल. वादीला नि.क्र.३४ च्या आदेशानुसार दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदाराने नि.क्र ३४ च्या आदेशानुसार त्वरित दुरुस्ती करावी.

SANJANA UDAY JAGUSTE
Digitally signed by SANJANA UDAY JAGUSTE
Date: 2025.02.20 13:29:20 +0530

दि. १७/०२/२०२५

(श्रीमती एस. यू. जागुष्टे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर व
शेवगाव